“मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी.

पदवीकरिता सादर केलेला शोध प्रबंध आराखडा

संशोधक

मुकेश धर्मराज निरुणे

(एम.ए., बी.एड्., एम.फिल., बी.जे. & एम.जे.)

मार्गदर्शक

डॉ.बस्वराज नागनाथराव नागलगावे

(एम.ए.,पीएच.डी.)

भूगोल विभाग प्रमुख

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी

ता. देवणी जि. लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

४१३५१७ जि. लातूर (महाराष्ट्र)

फेब्रुवारी, २०१६

“मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :

मानवी संस्कृतीमधील धर्म हा एक महत्त्वाचा घटक आहे. ऐतिहासिक काळात राष्ट्राच्या जडणघडणीत धर्माचा महत्त्वाचा सहभाग होता. धर्म राष्ट्रातील लोकांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम करतो. भिन्न भाषा व भिन्नवंशीय लोक धर्मामुळे एकत्र येऊ शकतात. धर्माला कोणत्याही प्रकारची प्रादेशिक सीमा नसते. धर्माधिष्ठित राष्ट्रवाद आधुनिक काळात कालबाह्य ठरलेला आहे. परंतु ठराविक धर्माचा ठराविक भागातच जास्त प्रमाणावर विस्तार झालेला दिसतो. धर्म हा मानवी समाजाच्या भावनाशी संबंधीत आहे. समाजजीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. म्हणूनच समाजाच्या विचारप्रणालीवर धर्माचा प्रभाव पडतो. धर्माच्या विविध परिपूर्ण व कृतार्थ करणारी, अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी, उच्चतम ध्येयप्राप्तीची जीवनपद्धती होय.

धर्म ह्या संकल्पनेची व्याख्या करणे सोपे नाही. कारण त्यात कित्येक तथ्ये आहेत. धर्माची व्याख्या काही तज्ज्ञांनी पुढीलप्रमाणे केली आहे.

आर.सी. चंदना यांच्या मते, “मानवाचा अद्भूत नैसर्गिक शक्तीवरील विश्वास किंवा त्याच्यामध्ये जागृत होणारी भावना उदा.दयाभाव, भीतीयुक्त आदर किंवा ज्यांना तो पवित्र समजतो.”

फेड्रिक शेल्मेशर यांच्या मते, “अत्युच्च किंवा निरपेक्ष विश्वासार्हतेची मनोभावना, निरपेक्ष म्हणजे तुलनात्मकदृष्ट्या सापेक्ष विश्वासार्हतेपेक्षा जास्त.”

जेम्स मार्टिन यांच्या मते, “धर्म म्हणजे एखाद्या चिरंतन ईश्वरावर विश्वास.”

मॅथ्यू आरनोल्ड यांच्या मते, “धर्म म्हणजे भावनेने उच्च, उदात्त बनलेली नीती.”

समान श्रद्धा, समजूत, अपेक्षा व नियंत्रण या धाग्यांनी समाज बांधलेला असतो. त्यामुळे इतर समूहापेक्षा त्याचे वेगळेपण ओळखता येते. अशा मूल्याधारित प्रणालीस धर्म असे म्हणतात. नैतिक मूल्याच्या अधिष्ठानाला धर्म असे म्हणतात. धर्माचा प्रसार लोकांच्या, त्यांच्या

धर्मविषयीच्या आकर्षावरणच अवलंबून असतो. धर्मातील विचारप्रवाह त्या-त्या उपलब्ध असणाऱ्या परिस्थितीवर अवलंबून असतो. प्रत्येक धर्मात होणारी सुधारणा सभोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून असते. धर्माचा प्रदेशावर निश्चितपणे परिणाम होत असतो. धर्माच्या सामाजिक, सामुदायिक आचरण पद्धती रुढी, परंपरा म्हणजेच धर्माचे नियम होत. प्रत्येक धर्माची आचरणपद्धती भिन्न असते. धर्माच्या आधारे राज्यसंस्थेचा विस्तार झाल्यावर तोच आचारधर्म, राष्ट्रधर्म होतो.

मानवी समाजाला उच्च सांस्कृतिक पातळीवर नेणारी धर्म ही एक प्रेरणा आहे. ही प्रेरणा अनेकदा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जगातील युद्धाचे कारणही ठरते. वल्केनबर्ग यांच्या मते, बौद्ध धर्म वगळता जगातील सर्व धर्मात असहिष्णुता आहे. त्यामुळे मानवाविरुद्ध मानव, समाजाविरुद्ध समाज उभा राहिलेला आहे. सध्याच्या जगात धर्म हा आंतरराष्ट्रीय संबंधातील प्रत्यक्ष घटक ठरला आहे. उदा.भारताचा इस्त्राईल व अरब राष्ट्र यांच्याशी असलेला संबंध, भारत-पाकिस्तान यांच्या संघर्षाच्या वेळी प्रभावित झालेला आपणास प्रकर्षाने जाणवतो.

धर्म हा सामाजिक भूगोलातील महत्त्वाचा अध्ययन घटक मानला जातो. कारण समाजाच्या शक्तीचे मूल्यमापन करताना त्या समाजातील धार्मिक जटिलता, धार्मिक सहिष्णुता विचारात घेतली जाते. मानव धार्मिक आस्थेशिवाय राहू शकत नाही. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास हा लोकसंख्येच्या धर्मावर आधारित आहे.

मानवी भूगोलामध्ये लोकसंख्या भूगोल ही एक महत्त्वाची शाखा असून त्याअंतर्गत लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा जसे अभिक्षेत्रीय विश्लेषण, लोकसंख्येची घनता, वाढ, वितरण, संरचना, व्यावसायिक रचना इत्यादींचा अभ्यास केला जातो. हे लक्षात घेऊन मराठवाड्यातील विविध धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनासाठी विषय निवडत असताना अनेक विषय सुचत होते मात्र अभ्यासविषय निवडायचा होता की जो विषय भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळाशी संदर्भ जोडणारा असावा या अनुषंगाने विचार केला. विविध धर्माची लोकसंख्या व त्याची वैशिष्ट्ये यांचा परिणाम अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, शिक्षण, संस्कृती, सामाजिक व राजकीय ऐक्य, विकास व प्रगती यावर होत असतो. मराठवाड्यात प्रामुख्याने हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन,

शिख, जैन व इतर धर्माची लोकसंख्या प्रामुख्याने आढळते. यांच्या वैशिष्ट्यांचा परिणाम हा विविध घटकांवर होत असतो असे दिसून येते. त्यामुळे “मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास” विषय निवडावा असे वाटले.

उद्दिष्ट्ये :

मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या (हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि इतर) लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांच्या अभ्यासासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येचे वितरण अभ्यासणे.

२) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येच्या वाढीचे अध्ययन करणे.

३) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर अभ्यासणे.

४) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास करणे.

५) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येच्या साक्षरतेचे अध्ययन करणे.

६) मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्येच्या व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

अभ्यास क्षेत्र :

इ.स.१७२४ ते इ.स.१९४८ या कालावधीत हा प्रदेश हा प्रदेश हैद्राबाद राज्यातील निजाम सत्तेच्या क्षेत्रात येत होता. १९५६ मध्ये मराठवाडा विभाग भाषावार प्रांतरचनेनुसार मुंबई विभागास जोडला गेला. १९६० मध्ये हा विभाग महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून महाराष्ट्रात विलीन करण्यात आला.

मराठवाड्याचे स्थान हे गोदावरी नदीखोऱ्यात असून या प्रदेशाचे अक्षवृत्तीय विस्तार १७°३५ उत्तर अक्षवृत्त ते २०°४१ उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७४°४० पूर्व रेखावृत्त ते ७८°१६ पूर्व रेखावृत्त आहे. मराठवाड्याच्या उत्तरेस जळगाव, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्याच्या सीमा येतात. तर पूर्वेला आंध्र प्रदेशातील कामारेड्डी, निजामाबाद व आदिलाबाद जिल्ह्याच्या सीमा येतात. तसेच दक्षिणेला कर्नाटक राज्याच्या बिदर व गुलबर्गा जिल्ह्याच्या सीमा असून पश्चिमेला महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर व सोलापूर या जिल्ह्याच्या सीमा आहेत. मराठवाडा प्रदेशाचा आकार हा त्रिकोणी आहे. याची पूर्व-पश्चिम लांबी ९३४ कि.मी.

तर उत्तर-दक्षिण लांबी ३३० कि.मी. आहे. औरंगाबाद हे या प्रदेशाचे विभागीय कार्यालय असून प्रशासकीयदृष्ट्या महाराष्ट्रात हा औरंगाबाद विभाग म्हणून ओळखला जातो.

सन २०११ च्या जनगणनेनुसार ८ जिल्हे, ७४ तहसील आणि ७९९४ खेडी आहेत. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी २१.०१% क्षेत्रफळ मराठवाड्याने व्यापलेले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या एकूण ११२३७४३३३ लोकसंख्येपैकी १८७५५८६१ (१६.६९%) औरंगाबाद (३७०१२८२), जालना (१९५९०४६), बीड (२५८५०४९), परभणी (१८३६०८६), हिंगोली (१२००३३४), नांदेड (३३६१२९२), उस्मानाबाद (१६५७५७६), लातूर (२४५४१९६) विविध धर्माची लोकसंख्या मराठवाड्यात वास्तव्य करून आहे. एकूण शेतीयोग्य जमिनीपैकी ६४.७९% जमीन मध्यम काळी, १२.९४ % जमीन खोल काळी मृदा व २२.२८% इतर प्रकारची जमीन आहे. या विभागाच्या पश्चिम भागात ७० से.मी. पेक्षा कमी पर्जन्य, मध्य भागात ७० ते ९० से.मी. पर्जन्य, तर पूर्व भागात ९० से.मी. पेक्षा जास्त पर्जन्य पडतो. या विभागात २९.९६% ते ३८.४५% पर्जन्याची विचलनशीलता आढळते. पर्जन्य हे अनिश्चित असते. या प्रदेशात सुमारे ३.५५% क्षेत्र जंगलाने व्यापले आहे. सुमारे १४.५% शेतजमीन जलसिंचनाखाली येते, त्यामुळे मराठवाड्यातील शेती ही मोसमी पर्जन्यावर चालणारा जुगार आहे. शेतीवर आधारित असणाऱ्या कारखानदारीस भरपूर वाव आहे, कारण या प्रदेशात खनिजांचा अभाव आहे.

माहिती स्त्रोत / आधार सामुग्री

संशोधनासाठी मराठवाड्यातील आठ जिल्ह्याचा अभ्यास करण्यात येणार असून त्यात मराठवाड्यातील हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शिख, जैन व इतर या धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात येणार असून द्वितीयक आकडेवारी जिल्हानिहाय जनगणना अहवाल, संशोधन पत्रिका, प्रकाशित व अप्रकाशित संशोधन अहवाल, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयीन माहिती, मासिके, साप्ताहिके, शोधनिबंध, दैनिक वर्तमानपत्रे, विविध संकेतस्थळे यातून माहिती मिळविली जाणार आहे.

प्रस्तुत अभ्यास हा द्वितीयक स्वरूपाच्या आधार सामुग्रीवर अवलंबून आहे. हा अभ्यास करण्यासाठी एकूण २० वर्षाचा कालावधी विचारात घेतला असून तो इ.स.२००१-२०११ हा आहे.

संशोधन पद्धती :

विविध प्रकारच्या माहिती स्त्रोतांच्या आधारे मिळविलेल्या आकडेवारीचे वर्गीकरण करून त्याचे चिकित्सक विश्लेषण केले जाणार आहे. धर्माच्या लोकसंख्येचे वितरण, वाढ, व्यावसायिक रचना, वय व लिंगरचना, साक्षरता स्पष्ट करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. याबरोबरच माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी विचलन, चतुर्थक विचलन, प्रमाणित विचलन या सांख्यिकीय पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. आकडेवारी अधिक स्पष्ट होण्यासाठी व तुलना करण्यासाठी विविध आलेख, आकृत्या व नकाशाचा वापर केला जाणार आहे. त्यानंतर त्याचे व्यवस्थितरित्या विश्लेषण करण्यात येणार आहे. अभ्यास क्षेत्रातील मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या तज्ञांच्या विविध सूत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा पुर्व इतिहास :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासात महत्त्वाचा घटक मराठवाड्यातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास हा असून यात प्रमुख धर्माचे अध्ययन वेगवेगळ्या घटकांनुसार आतापर्यंत झालेला आहे. भारतात धार्मिक गटावरील अभ्यास अल्प प्रमाणात आहे. पुढील काही तज्ञांच्या संशोधनाचा आढावा घेतलेला आहे.

हॉफमॅन (१९४८) यांनी पहिल्यांदाच भारतीय धार्मिक गटावर लक्षणीय काम केले आहे. त्यांच्या अभ्यासात "भारत मुख्य लोकसंख्या एकाग्रता" या शीर्षकाखाली त्यांनी भारतातील १९४१ च्या जनगणनेच्या आधारावर धार्मिक गटातील एकाग्रतेचे वर्णन केलेले आहे.

ब्रुस (१९४९) यांनी "भारतातील धार्मिक समुदाय वितरण" या लेखात भारतातील १९४१ च्या जनगणनेच्या आधारावर भारतातील धार्मिक समुदायाच्या वितरणाचा अभ्यास केला आहे.

हॉफमॅन व ब्रुस यांच्याप्रमाणेच डेव्हिस (१९५१) यांनी धर्माचा इतिहास भौगोलिक, स्थानिक, स्थान, विविध धर्माचा अभ्यास केला. त्यात त्यांना असे आढळून आले की, भारतीय स्वातंत्र्याच्या फाळणीनंतर त्याचा भौगोलिक परिणाम हिंदू, मुस्लिम व शिखांच्या विभाजनावर दिसून आला.

गोसल व मुखर्जी (१९७०) यांनी भारतीय धार्मिक लोकसंख्या विश्लेषण या लेखानुसार अल्पसंख्याक धार्मिक गट सीमालगत भागात दिसून आले.

एस.के. घोडे (१९८४), जिओग्राफी ऑफ रिलीजन : अ केस स्टडी ऑफ महाराष्ट्रा, अप्रकाशित एम.फिल शोधप्रबंधात त्यांनी महाराष्ट्रातील धार्मिक भूगोलाचा अभ्यास केलेला आहे.

भाटिया (१९९०) यांनी 'भारतातील विविध समुदायाची लोकसंख्यावाढ तथ्य आणि वास्तव' या अभ्यासविषयामध्ये हिंदू आणि मुस्लिम यांच्या येणाऱ्या शतकात होणाऱ्या लोकसंख्यावाढीवर प्रकाश टाकलेला आहे आणि भविष्यात म्हणजे १९८१ ते २०८१ या कालावधीत हिंदू लोकांची लोकसंख्या मुस्लिम लोकसंख्येपेक्षा जास्त वाढेल यामध्ये कुठलेही तथ्य नसून याउलट भारतामध्ये (हिंदू धर्मातील लोकसंख्या अधिक वाढेल) मुस्लिम लोकसंख्येपेक्षा अधिक हिंदू धर्मातील लोकसंख्या वाढेल असा अंदाज व्यक्त केला.

तिर्था (१९९६) यांनी १९८१ च्या जनगणनेनुसार विविध धार्मिक गट कशा प्रकारे विभागलेले गेले आहेत याचे विवेचन केले आहे.

अहमद (१९९९) यांच्या 'सामाजिक भूगोल' या पुस्तकामध्ये धार्मिक गट हे प्रादेशिक, धार्मिक एकीकरणाची ओळख करून देतात.

अय्यर (२००२) यांनी 'भारतातील लोकसंख्याशास्त्र आणि धर्म' या पुस्तकामध्ये हिंदू-मुस्लिम आणि कर्नाटक राज्यातील ख्रिश्चन स्त्रिया भारतातील लोकसंख्या वाढीमध्ये धर्माची भूमिका याचे परीक्षण अर्थशास्त्रीय सिद्धांतातील गणिताचा व संख्याशास्त्राचा वापर यावर आधारित हिंदू-मुस्लिम कर्नाटकातील ख्रिश्चन स्त्रियांचा क्षेत्रकार्य करून केला.

चंदना (२००५) यांनी त्यांच्या शोधनिबंधात आंतरधार्मिक विविधतेतील लोकसंख्येचे विश्लेषण केले आहे. त्यात ख्रिश्चन धर्मातील साक्षरता ही शिख धर्मातील साक्षरतेपेक्षा अधिक आहे. तसेच शिख धर्माची लोकसंख्या कमी आहे आणि इस्लाम धर्मातील लोकसंख्या ही अधिक आहे. परंतु हिंदू धर्मातील साक्षरतेपेक्षा इतकीही मागे नाही.

किशन (२००७) यांनी त्यांच्या 'भारतातील अल्पसंख्याक : स्वातंत्र्यापासून लोकसंख्येतील वाढ आणि स्थानिक विस्तार' या शोधनिबंधात विशेष नमुद केले की, सर्व अल्पसंख्याक धार्मिक गट प्रामुख्याने विस्तारलेले आहेत आणि त्यांच्यातील मूलभूत धार्मिक घटक, धार्मिक रचना यामध्ये १९५१ ते १९९१ दरम्यान कुठलाही बदल झाला नाही.

दिव्यजीत कौर (२०१२) यांनी पंजाबी विद्यापीठास सादर केलेल्या 'स्पॅशिअल पॅटर्न ऑफ पॉप्युलेशन कॅरेक्टरस्टिक ऑफ मेजर रिलीजियस ग्रूप ऑफ इंडिया' या अप्रकाशित शोधप्रबंधात भारतातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे.

डॉ.दिपक वानखेडे यांनी आपल्या 'डिस्ट्रीब्युशनल पॅटर्न ऑफ मेजर रिलीजीयस कम्युनिटीज इन महाराष्ट्रा : अ स्पेशिओ टेम्पोरल ॲनालिसिस' या शोधनिबंधात १९८१ आणि १९९१ च्या जनगणनेच्या आधारावर महाराष्ट्रातील प्रमुख धर्माच्या लोकसंख्यावाढीचा व वितरणाचा अभ्यास केलेला आहे.

डॉ.तोळमारे एस.एस. (२०११) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेल्या 'शिख धर्मिय लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा' या अप्रकाशित शोधप्रबंधात नांदेड जिल्ह्यातील शिख धर्मियांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास केलेला आहे.

डॉ.डोंगे एस.बी. (२०१६) यांनी अर्थशास्त्र विषयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेल्या 'लातूर जिल्ह्यातील मराठा व लिंगायत समाजाचा सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास' शोधप्रबंधात मराठा व लिंगायत समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

प्रकरण मांडणी :

सदरील अभ्यास नऊ प्रकरणात करण्यात येणार असून ते खालीलप्रमाणे आहेत.

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना, उद्दिष्ट्ये, अभ्यास क्षेत्र, माहिती स्त्रोत/आधार सामुग्री, अभ्यास पद्धती, संशोधन पूर्व इतिहास, प्रकरण मांडणी/नियोजन आदि घटकांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण दुसरे - मराठवाड्याची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना

प्रकरण दोनमध्ये प्रस्तावना, प्राकृतिक-भौगोलिक स्थान, भूगर्भरचना, हवामान, जलसंपदा, मृदा, खनिजे, नैसर्गिक वनस्पती, सांस्कृतिक, भूमी उपयोजन, शेती, जलसिंचन, वाहतूक-दळणवळण आदि घटक अभ्यासले जातील.

प्रकरण तिसरे - मराठवाड्यातील प्रमुख धर्मनिहाय लोकसंख्येचे वितरण

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात प्रस्तावना, वितरणाची वैशिष्ट्ये, वितरणाचे स्वरूप, वितरणाला प्रभावित करणारे घटक, लोकसंख्येची शहरी व ग्रामीण विभागणी अभ्यासली जाईल.

प्रकरण चौथे - धर्मनिहाय लोकसंख्या वाढ

चौथ्या प्रकरणात प्रस्तावना, लोकसंख्या वाढ, कल, वैशिष्ट्ये, लोकसंख्या वाढीचे अभिक्षेत्रीय प्रारूप, शहरी व ग्रामीण लोकसंख्या वाढ अभ्यासली जाईल.

प्रकरण पाचवे - धर्मनिहाय लिंगरचना

प्रकरण पाचव्यात प्रस्तावना, लिंगरचना, महत्त्व, लिंग गुणोत्तर, लिंग रचनेचे प्रारूप, लिंग रचनेतील अभिक्षेत्रीय फरक, शहरी व ग्रामीण लिंगरचना आदी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे - धर्मनिहाय वयोरचना

प्रस्तुत सहाव्या प्रकरणात प्रस्तावना, वयोरचना, वयोरचना महत्त्व, वयोरचनेचे प्रारूप, वयोरचनेतील अभिक्षेत्रीय फरक, वयोरचनेनुसार ग्रामीण व शहरी रचना अभ्यासण्यात येईल.

प्रकरण सातवे - धर्मनिहाय साक्षरता

प्रकरण सातमध्ये प्रस्तावना, महत्त्व, साक्षरतेचा कल, साक्षरतेमधील बदल, स्त्री-पुरुष साक्षरता, शहरी व ग्रामीण साक्षरता, साक्षरतेवर परिणाम करणारे घटक अभ्यासले जातील.

प्रकरण आठवे - धर्मनिहाय व्यावसायिक रचना

प्रकरण आठमध्ये प्रस्तावना, महत्त्व, स्त्री-पुरुष व्यावसायिक रचना, स्त्री-पुरुष कामगारांचे प्रमाण, व्यवसायानुसार कामगारांचे वर्गीकरण अभ्यासले जाईल.

प्रकरण नववे - निष्कर्ष आणि शिफारशी

संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष मांडून काही शिफारशी सुचविण्यात येतील.

संशोधक
मुकेश धर्मराज निरुणे

मार्गदर्शक
प्रा.डॉ.बस्वराज नागनाथराव नागलगावे